
# मणपाक्कम येथील बातम्या

## जून २०१३

ब्रह्मांड आणि कान्हा या प्रकल्पांच्या जमिनींच्या दस्तऐवजांमध्ये गुरुदेव विशेष रस घेत असल्याने या प्रयत्नांमध्ये जणू काही नवचैतन्य संचारले आहे. "मी सुद्धा तुमच्याप्रमाणेच एक जमीन मालक असून सर्वांच्या फायद्यासाठी ह्याचा लवकरात लवकर निर्णय लागावा अशी माझीही तीव्र इच्छा आहे" असे वक्तव्य गुरुदेवांनी निवासकक्ष 'अ' मध्ये उपस्थितांना संबोधित करताना केले.



पूज्य बाबूजींचे लिखाण असलेली काही पुस्तके गुरुदेवांनी बंधू कमलेश यांना दिली होती. आपली स्वत:ची मूळ दैनंदिनीसुद्धा गुरुदेवांनी त्यांना दिली होती. हा एक अनमोल ठेवा असून भविष्यकाळामधे प्रत्येकाला उपयोगी पडणार आहे असे बंधू कमलेश याबद्दल म्हणाले. यावर गुरुदेव म्हणाले, "याचा कोणाला उपयोग होईल असे मला वाटले नव्हते. केवळ माझ्यासाठी, भूतकाळातील घटनांची नोंद ठेवण्यासाठी मी लिहीत असे." १९६४ –१९९४ या दरम्यान गुरुदेव दैनंदिनी स्वत:च्या हस्ताक्षरात लिहीत असत, १९९५ पासून त्यांनी संगणकावर टंकलेखन करण्यास सुरुवात केली.

दैनंदिनीविषयी एका प्रसंगाबद्दल सांगताना गुरुदेव म्हणाले, की एक दिवस सकाळी ५ वाजता 'गायत्री' येथे, बाबूजी महाराजांच्या शयन–कक्षाच्या बाहेर बसून ते दैनंदिनी लिहीत होते. अचानक बाबूजी महाराज बाहेर आले आणि त्यांनी ती पहाण्यासाठी मागितली. गुरुदेवांनी दैनंदिनी दाखविल्यानंतर ते म्हणाले, "अरे, मी जे काही बोललो ते सर्व काही तू यात लिहीले आहेस. जे मलाही आठवत नाही ते सर्व काही तुझ्या कसे लक्षात राहते?" यावर गुरुदेव उत्तरले, "मी त्या दिवसामध्ये स्वत:ला घेऊन जातो आणि सर्वकाही माझ्या डोळ्यांसमोर उभे राहते." हे ऐकून बाबूजी महाराज अत्यंत आनंदित झाले आणि उद्गारले, "याला म्हणतात संशोधन."

यानंतर गुरुदेवांनी एका प्रसंगाचा उल्लेख केला. बाबूजी महाराजांनी गुरुदेवांना विचारले होते की अंथरुणावर आडवे झाल्याबरोबर त्यांना झोप कशी लागते? यावर गुरुदेव म्हणाले "माझ्या कपाळामधून डोळ्यांमध्ये निद्रा हळूहळू उतरत आहे अशी फक्त कल्पना मी करतो आणि मला ताबडतोब झोप लागते." यावर बाबूजी महाराज म्हणाले होते, "हे पहा, संशोधन म्हणजे केवळ ढीगभर कागदांवर लेखन किंवा उपपत्ती नव्हे. हे खरे, अस्सल संशोधन आहे."

पूज्य बाबूजींसोबत प्रवासादरम्यान मी बरेचसे काम शिकलो. ते मला काम करण्यास देत असत व ते स्वत: निरीक्षण करीत असत. काही वेळा त्यांच्या बाजूला बसवून घेऊन (प्राणाहुतिचे) प्रक्षेपण करण्यास सांगत असत. मला त्यांच्यासोबत दहा वर्षे तरी अजून मिळावयास हवी होती. बाबूजी मला म्हणाले होते की २००६ किंवा २००७ पर्यंत ते माझ्याबरोबर असतील, पण ते कित्येक वर्षे आधीच निघून गेले."

## जुलै २०१३

काही महिन्यांपूर्वी गुरुदेव इंटरनेटवर 'अपगमन सत्र' पहात होते. हे सत्र 'मेनी लाईव्स, मेनी मास्टर्स' या पुस्तकाचे लेखक ब्रिआन वेस यांचे होते. याच लेखकाने 'मिरॅकल्स हॅपन' हे नवे पुस्तक लिहिले आहे, व गुरुदेवांनी ते वाचण्यास सुरुवात केली आहे. अपगमन उपचारादरम्यान आपल्या पूर्वजन्मात जाणाऱ्या लोकांविषयी हे पुस्तक आहे. अनेक उदाहरणांनी हे दाखवून दिलेले आहे की या जन्मामध्ये आपल्या भेटी–गाठी व एकत्र येणे (अनुबंध) हे केवळ योगायोग नसून अनेक आधीच्या जन्मांमधील अनुबंधांचे सातत्य असते. हाच या पुस्तकाचा प्रमुख मुद्दा आहे.

गुरुदेव एका वेळी सुमारे २–३ पुस्तके वाचत असतात व प्रत्येक वाचन–सत्रासाठी ते यापैकी एक पुस्तक निवडतात. ओमेगा शाळेचे दोन–तीन विद्यार्थी गुरुदेवांना पुस्तके मोठ्याने वाचून दाखविण्यासाठी आठवड्याच्या शेवटी येतात. हे वाचन ऐकताना त्यांचे डोळे बंद असतात व वाचनावर त्यांचे चित्त एकाग्र झालेले असते.







## सिंगापूर ध्यान केंद्राचे उद्घाटन

### बुधवार, दि. ३ जुलै, २०१३

“सिंगापूर येथील ध्यान केंद्राची आपण बऱ्याच वर्षांपासून वाट पाहत होतो.” असे गुरुदेव म्हणाले. व्हिडीओ लिंकद्वारे सिंगापूर येथील अभ्यासींना भेटण्यासाठी ते लवकरच तयार होऊन बसले होते. सिंगापूरच्या अभ्यासींना ध्यानासाठी बसण्याबद्दल सांगितले गेले होते व गुरुदेव त्यानंतर समारंभात सहभागी होणार होते. सिंगापूर ध्यान केंद्रातील सत्संग संपल्याबरोबर गुरुदेव आतूरतेने चालत आपल्या कार्यालयात गेले. सिंगापूर येथील अभ्यासींना अभिवादन करून गुरुदेवांनी त्यांना उत्कृष्ट असे भाषण दिले. ‘ट्विंकल ट्विंकल लिटल स्टार’ या बालगीताला उद्धृत करून गुरुदेव म्हणाले, “हिरा हा बाहेरून प्रकाशाला परावर्तित करीत नाही. त्यामधे ‘संपूर्ण अंतर्गत परावर्तन’ हा गुणधर्म असतो. हिऱ्याच्या अंतरंगातील प्रकाशाला जरासुद्धा न निसटू देता परावर्तित केला जातो. त्यामुळेच हिरा अतिशय तेजस्वी, आकर्षक आणि अद्भूत असा दिसतो... तुमच्या हृदयातील प्रकाशसुद्धा, ज्यावर आपण ध्यान करणे अपेक्षित आहे, त्याला वाढण्याची आणि आपल्या अंतरंगात परावर्तन करीत प्रवेश करण्याची संधी दिली पाहिजे, तरच एक दिवस तुम्ही एक तेजस्वी तारा बनाल.”

एके दिवशी गुरुदेव सकाळी लवकर जागे झाले आणि त्यांनी बाहेर येऊन बसावयाचे ठरविले. काही काळ नि:शब्दतेत घालविल्यानंतर वाचून दाखविण्याकरीता वर्तमानपत्रे आणण्याबद्दल त्यांनी सांगितले. थोड्या वेळाने, बंधू सतबीर यांच्या आगमनानंतर ई–मेल पाहण्याचे त्यांच्या मनात आले. ईमेल पाहण्यासाठी जाताना गुरुदेवांची बैचेनी लक्षात येत होती. ते नेहमीच कामाला प्राधान्य देतात.

### बुधवार, दि.१० जुलै, २०१३

९ वाजताचा, सुमारे ४० मिनिटांचा सत्संग संचालित केल्यानंतर गुरुदेवांनी चार विवाह व एक वाङ्.निश्चय संपन्न केला. ते दमलेले दिसत होते, त्यामुळे आराम करण्यासाठी गेले. त्याच दिवशी संध्याकाळी थोडा पाऊस पडत असल्याने त्यांनी कुटीराच्या पोर्चमध्ये सत्संग संचालित केला. सत्संग संपल्यानंतर सुमारे अर्धा तास मुसळधार पर्जन्यवृष्टी झाली.

गुरुदेवांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने सुमारे १०,००० अभ्यासींना सामावून घेता येईल अशी व्यवस्था उभारण्याचे काम चेन्नई येथे चालू होते. याकरीता लागणारे अंदाजपत्रक तयार करून सादर करण्यात यावे असा गुरुदेवांनी आदेश दिला.

चेन्नई येथे पावसाळ्याची सुरुवात झाली होती आणि एके रात्री आपल्या व्हीलचेअरमध्ये बसून धुंवाधार पाऊस पाहण्याचा आनंद गुरुदेवांनी अनुभवला. “दोन तास अशी पर्जन्यवृष्टी झाली तर पाण्याचे प्रश्न निकालात निघतील” असे गुरुदेव म्हणाले.


प्रशिक्षक उमेदवारांना सिटींग देण्याचे काम गुरुदेवांनी नियमितपणे चालू केले आहे. दिवसाची सुरुवात ते या कामाने करतात व या कामावर त्यांचे लक्ष इतके केंद्रित झालेले असते की ते संपेपर्यंत काहीही त्यांना विचलित करु शकत नाही.

### शनिवार, दि. १३ जुलै, २०१३

गुरुदेवांना या दिवशी अनेक सिटींग्स द्यायच्या होत्या. सकाळी ७.१५ वाजता सिटींग्स संपल्यानंतर त्यांच्या डोळ्यांच्या उपचारांना सुरुवात झाली. एल. सुब्रमणियम यांचे संगीत ऐकत असताना गुरुदेव केस कापून घेत होते. या वेळी गुरुदेवांना त्यांच्या एका निकटवर्ती सहकाऱ्याच्या निधनाची बातमी समजली. त्यांची मन–स्थिती बदलली व ते एका वेगळ्याच जगात वावरत आहेत असे वाटू लागले. ते उद्गारले, “एक क्षण येथे, पुढच्या क्षणी गायब– कुठे ते कोणालाच माहिती नाही.” यानंतर सुमारे एक तास गुरुदेव विलक्षण स्तब्ध होते. आपले डोळे बंद करून किंवा अंतराळात नजर लावून बसले होते.

## रविवार, दि.१४ जुलै २०१३

गुरुदेव ध्यानगृहामध्ये जाण्याच्या तयारीत होते परंतु सकाळी त्यांची प्रकृति थोडी अस्थिर असल्याने डॉक्टरांनी त्यांना त्यांच्या निवासस्थानीच राहण्यास सांगित–ले. गुरुदेवांच्या निवासस्थानाचा मध्यवर्ति दिवाणखाना हे लग्नविधीचे स्थळ बनले आहे. त्यांनी ध्यान संचालित केले व पाच विवाहही संपन्न केले.



सुमारे एक तास चाललेल्या बंधू संस्कृत कन्नन यांच्या गीतेवरील व्याख्यानादरम्यान गुरुदेव दिवाणखान्यामध्येच बसले होते. आतापर्यंत त्यांनी गीतेचे पहिले सहा अध्याय पूर्ण केले आहेत. प्रत्येक सत्राच्या समापनाच्या वेळी बऱ्याचदा गुरुदेव काही समारोपाची टीप्पणी करतात.

दि. २० जुलै रोजी भार्गव अमेरिकेहून परत आले. गुरुदेव खूप आनंदात होते व ते म्हणाले, “ये माझ्या नातवा. मी तुझी वाट पाहत होतो.” त्यांनी थोडावेळ कुटुंबासमवेत व्यतीत केला व त्यानंतर उपस्थितांना सिटींग दिले. या सिटींगनंतर त्यांनी बंधू वुल्लिमिअर व बंधू अल्बर्टो यांच्यासमवेत विविध प्रशिक्षणासंबंधी चर्चा केली. त्यांनी विचारले, "वाढीला आनुषंगिक असा अहंकार न वाढू देता विकास कसा साधता येईल हे या विषयाचे गूढ आहे. लहान मुलांचेच उदाहरण घ्या. ती ३ वर्षांची होताच त्यांच्यामध्ये अहंकार जागृत होतो. वडील म्हणतात, “हे कर.” “मला माहित आहे.” कदाचित विकासाच्या सुरुवातीला आत्मविश्वास येण्यासाठी, जगाला सामोरे जाण्यासाठी, व्यावहारिकतेसाठी याची (अहंकाराची) गरज असू शकेल. परंतु, हे आपल्या पहिल्या वहिल्या, दुधाच्या दातांप्रमाणे आहे. ते पडून जातात हे आपल्याला ठाऊक असेलच. त्याचप्रमाणे, अहंकारसुद्धा परिपक्व होऊन विनम्रतेच्या रूपात बहरला पाहिजे."



## सोमवार, दि.२२ जुलै २०१३ गुरुपौर्णिमा

जेव्हा अभ्यासी गुरुदेवांच्या सानिध्यात असतो, तेव्हा हा त्या अभ्यासीच्या जीवनामधील सर्वात महत्वाचा दिवस असतो. आश्रम अभ्यासींनी पूर्ण भरला होता. गुरुदेव भल्या पहाटे तयार झाले होते व ते बऱ्याच अभ्यासींना भेटले. हैद्राबादच्या गटाने कान्हा शांती वन या प्रकल्पाचा आणलेला एक भव्य नमूना गुरुदेवांनी सखोलपणे अभ्यासला. ते या नमुन्याने खूपच प्रभावित झाले. बऱ्याच अभ्यासींना अभि–मानाने तो दाखविण्यासाठी बोलवून त्याची विविध वैशिष्ट्ये गुरुदेव त्यांना समजावून सांगत होते.

गुरुदेवांनी ध्यानगृहामध्ये सकाळचा सत्संग संचालित केला व नंतर त्यांनी एक भाषण दिले. भाषणात ते म्हणाले की सहजमार्गाकडे आपणाला देण्यासाठी अपरंपार आशीर्वाद आहेत. परंतु त्यापैकी आपण किती घेऊ शकतो? ते म्हणाले, “स्वतःला प्रामाणिकपणे पडताळून पाहणे आणि स्वतःची परीक्षा करणे यापासून स्वतःला वंचित ठेवू नका व निदान आतातरी तुमच्यामध्ये असलेल्या, तुम्हाला माहीत असलेल्या कलुषित गोष्टी काढून फेकून द्या."

## गुरुदेवांचा ८७ वा जन्मदिवस समारंभ

गुरुदेव बऱ्याच पहाटे तयार होऊन बसले होते. स्वयंपाकघराच्या गटाने जो प्रसाद आणला होता, त्याला त्यांनी पवित्र केले व त्यांच्या विन–ंतीमुळे गुरुदेवांनी केकही कापला. बंधू कृष्णा व बंधू कमलेश आपल्या कुटुंबियांसमवेत गुरुदेवांना भेटले. सूर्योदयाच्या पूर्वीच गुरुदेवांच्या निवासस्थानाच्या फाटकासमोर अभ्यासींचा मोठा समुदाय त्यांची वाट पाहत उभा होता. गुरुदेव त्यांच्या शयनकक्षात बसले होते व निवासस्थानाच्या स्वयंसेवकांनी अभ्यासींचे गुरुदेवांना भेटून शुभेच्छा देणे सुकर केले. सकाळच्या ध्यानासाठी गुरुदेव बाहेर य–ेण्याआधी सुमारे २५० अभ्यासी गुरुदेवांना भेटले असतील. गुरुदेव त्यांच्या चाकांच्या खुर्चीमध्ये बसून ध्यानगृहामध्ये आले. यावर्षी भंडारा आयोजित न करता अभ्यासींना हा दिवस आपापल्या केंद्रामध्येच






साजरा करण्यास सांगितले आले होते. चेन्नईमधील घडामोडींचे सहक्षेपण करण्यासाठी एक व्हीडिओ लिंक प्रस्थापित करण्यात आली होती. सत्संग, पुस्तकांचे प्रकाशन, गुरुदेवांचे भाषण, गुरुदेव माघारी जात असल्याची घोषणा, लगेच पुन्हा गुरुदेवांनी काही बोलण्याची इच्छा दर्शविणे व अशाप्रकारे दुसरे भाषण देणे, भजने हे सर्व स्वर्गीय तसेच मणपाक्कम व इतरत्र उपस्थित असणाऱ्या सर्वांसाठी मंत्रमुग्ध करणारे होते.

आपल्या पहिल्या भाषणादरम्यान गुरुदेवांनी आध्यात्मिक उत्क्रांती केवळ स्वत:करीता नसते याची सर्वांना आठवण करून दिली. आपली मुले आणि आपले सामाजिक मित्रमंडळ देखील आपल्यासोबत विकसित झाले पाहिजे असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, “निवड करण्याचे स्वातंत्र्य ही आपल्यासाठी सर्वात धोकादायक बाब आहे, कारण जर निवड करण्याचे शहाणपण/ विवेक नसेल तर ह्या स्वातंत्र्यामुळे तुम्ही अयोग्य गोष्टींच्या आहारी जाल... सहजमार्ग साधा आहे पण साधे रहाण्यास धाडस असावे लागते. आपल्या हृदयात काय आहे ते सांगण्यासाठी धैर्य असावे लागते.”



त्यांच्या दुसऱ्या भाषणात गुरुदेव म्हणाले, “तुम्हा सर्वांशिवाय मला एकाकी वाटते. अगदी उत्सव सुरू होण्याआधीपासून मी विचार करत आहे की हे सर्व लोक फक्त काही दिवसांसाठीच येत आहेत व नंतर ते सर्व मला सोडून जातील आणि मला फार एकाकी वाटेल, मला अतिशय दु:ख होईल. याकरीता, माझे एकाकीपण दूर करण्यासाठी मला माझ्या आध्यात्मिक मार्गात सोबत– यांची आवश्यकता आहे, जे इथे असले वा नसले तरी त्यांची उपस्थिती मला नेहमीच जाणवेल.”

सकाळच्या सत्रानंतर, गुरुदेवांचे कुटिरामध्ये अभ्यासींना भेटणे सुरू होते. दुपारच्या वेळी सुमारे पन्नास रशियन अभ्यासींच्या एका गटामुळे गुरुदेवांचे शयनकक्ष भरून गेले आणि वातावरण बदलले, त्यात एक हलकेपणा आला व गुरुदेवांनी अचानक सिटींग देण्याचे ठरवले! त्यानंतर त्यांनी रशियाला जाण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली आणि रशियन चमूने पुढील उन्हाळ्यामधे कार्यक्रम आयोजित करण्याची योजना बनवणे सुरू केले. जेव्हा असे उत्स्फूर्त व आनंददायक प्रसंग घडतात तेव्हा गुरूदेवांच्या प्रकृतीचा प्रश्न उद्भवतच नाही. त्यांची तब्येत तोळामासा असूनदेखील प्रवासाबाबतच्या त्यांच्या प्रखर तळमळीमुळे अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रु आले.

संध्याकाळी बासरीवादक बंधू शशांक यांनी ध्यानगृहात मिश्र पध्दतीचे संगीत सादर केले. गुरुदेवांनी काही भाग थेट प्रक्षेपणाद्वारे बघितला. गुरुदेवांच्या दिवसाची सांगता नेहमीप्रमाणे चित्रपट पाहण्याने झाली. रात्री सुमारे १० वाजता ते आराम करण्यास गेले.

## गुरुवार २५ जुलै २०१३

गुरुदेव त्यांच्या कार्यालयात सत्संग संपण्याच्या प्रतिक्षेत, ई मेल पाहात होते. त्यानंतर त्यांनी बंधू कमलेश यांचे भाषण अत्यंत एकाग्रतेने ऐकले. त्यानंतर तेथे मोल्डोवा येथील ध्यानकक्षाबद्दल एक चित्रफीत





दाखविण्यात आली. ती चित्रफीत पाहून गुरुदेव खूष झाले. ध्यानकेंद्राची रचना उत्कृष्ट असून स्वयंपाकघर व भोजनगृह सुविधा अतिशय उच्च प्रतीच्या होत्या. निवासस्थान आलिशान हॉटेलमधील कक्षाप्रमाणे होते, आणि गुरुदेव म्हणाले की ध्यानकक्ष तर उड्डाणास सज्ज असलेल्या अवकाशयानाप्रमाणे दिसतो आहे! कमी अभ्यासी असलेल्या छोट्याश्या केंद्राने घेतलेले परिश्रम पाहून गुरुदेव व बंधू कमलेश फार आनंदित व रोमांचित झाले.

चित्रफीतीनंतर गुरुदेवांनी सर्वांना सिटींग दिले व प्रत्येकाला सिटींगचा अनुभव कथन करण्यास सांगितले. प्रत्येकाने सिटींगदरम्यान काय जाणवले ते सांगितले. सर्वांचे ऐकल्यानंतर गुरुदेव म्हणाले, "हे सिटींग विशेष होते, कारण केलेल्या कामासाठी मी एका विशिष्ट तंत्राचा वापर केला होता."

गुरुदेव यश व अपयशाबाबत बोलत होते. ते म्हणाले, "अपयश हे विशिष्ठ कारणामुळे असते. यश नव्हे. माझ्या विक्रीसंबधीच्या संभाषणात मी सहकार्याविषयी बोलत असे. जेव्हा गाडी व्यवस्थित चालत असते तेव्हा 'ती का चालत आहे?' असे तुम्ही म्हणू शकता का? तर नाही. परंतु ती जेव्हा नादुरुस्त होते तेव्हा ती नादुरुस्त होण्याचे कारण तुम्हाला नक्कीच सागंता येते."

## ऑगस्ट २०१३

शुक्रवार, दि.२ ऑगस्ट रोजी तिथीनुसार गुरुदेवांचा जन्मदिवस होता आणि कुटिरामधील सर्व बंधूंनी धोतर व निळा शर्ट घातला होता. गुरुदेवांनी सकाळी प्रसाद दिला व सुमारे पन्नास अभ्यासींच्या दुपारच्या भोजनाचा बेत त्यांनी केला होता. अंगणात त्यांनी सर्वांसोबत भोजन केले.

## उत्तर अमेरिकेतील प्रशिक्षकांचे चर्चासत्र – ऑगस्ट ८ ते १०

दि. ८ रोजी सकाळी, गुरुदेवांची प्रकृती ठीक नव्हती त्यामुळे जरी सर्व प्रशिक्षक कुटिराबाहेर जमा झाले होते तरीही कार्यक्रम बदलण्यात आला व ते सर्व जण सभागृहात परतले कारण गुरुदेव त्यांना संबोधित करण्याच्या स्थितीत नव्हते.

तथापि, संध्याकाळी, गुरुदेव कुटिराबाहेर येऊन बसले व त्यांनी सर्वांना आश्चर्यचकित केले. गुरुदेवांनी सर्व उत्तर अमेरिकेतील प्रशिक्षकांना संबोधित केले व त्यांना गुरुदेवांसमवेत काही काळ व्यतीत करता आला.

सुमारे १४० प्रशिक्षकांसाठी बंधु संतोष श्रीनिवासन व चौदा समन्व–यकांच्या चमूने 'प्रशिक्षकांचे अनुभव गहिरे करणे' हे सत्र संचालित केले. तिन्ही दिवशी बंधू कमलेश यांनी भाषणे केली. चर्चासत्राची सांगता प्रश्नोत्तराच्या सत्राने झाली.

## शुक्रवार ऑगस्ट ९, २०१३

आश्रमाच्या शेजारी राहणारे एक मुस्लिम कुटुंब दरवर्षी रमजानच्या शेवटच्या दिवशी, ईदला गुरुदेवांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेते. गुरुदेवांनी त्यांना आमंत्रित केले, सर्व मुलांना भेटले, त्यांना मिठाई दिली, प्रसाद दिला आणि तेथे उपस्थित असलेल्या सर्वांनाही त्याचे वाटप केले व सत्संगाचे संचालन केले.

## उत्तर अमेरिकन चर्चासत्र – ऑगस्ट ११ ते १७




आध्यात्मिक विकासासाठी एकत्र जमलेले उत्तर अमेरिका व कॅनडा मधील बंधू व भगिनी गुरुदेवांनी दिलेल्या: "पूर्वग्रह हा आध्यात्मिक विकासातील सर्वात मोठा अडसर आहे." या संकल्पनेत व्यस्त होते. गुरुदेवांनी बंधू पी. आर. कृष्णा, कमलेश, रोब क्लिंगर, कन्नन, विनोद व भगिनी एलीझाबेथ यांना खास वक्ते म्हणून नियुक्त केले होते.

बंधू कमलेश यांनी मिशनचे साहित्य वाचण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि चर्चासत्रादरम्यान दुपारचा वेळ आपल्या गुरुदेवांची ग्रंथसंपदा वाचण्यात व्यतीत करावा असे सुचवले. आपल्या पूज्य गुरुंच्या लिखाणासंबंधी पार्श्वभूमी माहित असणे का महत्त्वाचे आहे याचे त्यांनी स्पष्टीकरण दिले.








◄ १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहण करताना बंधू कमलेश






सहजमार्ग, आध्यात्मिकतेचे कार्य, एक युवक म्हणून आध्यात्मिकतेचे त्यांच्याशी काय नाते आहे तसेच गुरुदेवांचे त्यांच्या जीवनातील स्थान इत्यादि विषयावर चर्चा करू इच्छिणाऱ्या १३ ते १९ या वयोगटातल्या युवकांना या संमेलनात प्रशिक्षणाची संधी मिळाली.

बंधू व्हिक्टर कन्नन यांनी विद्यार्थी व शिक्षकांना 'यू कनेक्ट' (विद्यापीठ संलग्नता) या उपक्रमाची ओळख करून दिली. सहजमार्ग भावी पिढ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी उच्च शिक्षण घेत असलेल्या अभ्यासी विद्यार्थ्यांनी सक्रीय व्हावे असे आवाहन बंधू कृष्ण लिंग यांनी केले.

या परिषदेदरम्यान चेन्नईत सतत पाऊस पडत होता व दि.१६ नंतर तो कमी झाला. संध्याकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांच्या कुटीराचे दार सर्व अभ्यासींसाठी खुले ठेवले जात होते. दि. १६ रोजी संध्याकाळी आठ वर्षांच्या एका धीट मुलाने गुरुदेवांना विचारले, 'गुरुदेव, देव स्वतःला तुमच्यामध्ये का लपवून ठेवतो? तो स्वतः दर्शन का देत नाही?' गुरुदेव उत्तरले, "जर देव लपत असेल तर त्यामागे नक्की तसेच काहीतरी कारण असेल. ते कारण जर माहित झाले तर देवाला लप–ण्याची गरजच उरणार नाही." केवळ गुरुदेवच इतके सुंदर उत्तर देऊ शकतात!

दि. १७ च्या संध्याकाळी गुरुदेव सतत स्मितहास्य करत होते. खूप मोठ्या समुदायातील मुलांशी ते हस्तांदोलन करत होते. गुरुदेवांच्या इतक्या जवळ असल्याचा मुलांना खूप आनंद झाल्याचे दिसून येत होते. हळूहळू मोठी माणसेही त्यात सामिल झाली. काही जण धारिष्ट्य करून गुरुदेवांना मिठाई व अन्य भेटवस्तू देऊन गुरुदेवांचे अभीष्टचिंतन करू लागले. गुरुदेवांनी त्या प्रत्येकाला अत्यंत सोशीकपणे व शांतपणे प्रतिसाद दिला. चर्चासत्राच्या मुख्य विषयाच्या अनुषंगाने एका अभ्यासी बंधूने गुरुदेवांना विचारले, 'प्रेम हे पूर्वग्रहाच्या उलट असते काय?' गुरुदेव तत्काळ उत्तरले, "प्रेमाच्या उलट असे काहीच नसते." "ज्याप्रमाणे ईश्वराच्या उलट काही नसते त्याप्रमाणे प्रेमाच्या उलट ही काही नसते."

जेव्हा त्यांना विचारले गेले की त्यांची प्रकृती कशी आहे तेव्हा ते म्हणाले की तितकीशी चांगली नाही पण काही तक्रारही नाही. त्यांना अशा अवस्थेत पाहणे काळजाला भिडणारे होते. त्यामुळे काही क्षण एकदम शांतता पसरली.

या संपूर्ण परिषदेच्या दरम्यान गुरुदेवांची प्रकृती ठीक नव्हती. त्यामुळे त्यांच्या जवळ जवळ सर्वच नियोजित भेटी, बैठका व सत्संग रद्द करण्यात आले. परंतु गुरुदेवांची उत्स्फूर्तता अबाधित होती. जेव्हा जेव्हा तब्येत साथ देत असे तेव्हा ते उपलब्ध असत. कुटीच्या बाहेर येत, अभ्यासींना भेटत, इतरांनी दिलेली भाषणे ऐकत. गुरुदेवांनी (वर बाबूजी महाराजांच्या दिशेने निर्देश करत) सांगितले की, "अभ्यासींसाठीच्या माझ्या उपलब्धतेचे नियंत्रण अधिकाधिक वरून होत चालले आहे. आणि तिच्यावर बऱ्याच मर्यादा येत चालल्या आहेत. जरुरीपेक्षा जी गोष्ट जास्त प्रमाणात उपलब्ध असते तिची किंमत राखली जात नाही. म्हणून मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा घ्यायची मी शिफारस करतो."






## पूज्य गुरुदेवांच्या ८७व्या जन्मदिवसाचा उत्सव

प्रिय गुरुदेवांचा ८७ वा वाढदिवस साजरा करण्यासाठी संपूर्ण देशभरामध्ये पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित केले गेले होते. विविध केंद्रांमध्ये दिवसाची सुरुवात सकाळच्या सत्संगाने झाली आणि नंतर युवा अभ्यासी आणि मुलांनी छोटी नाटके आणि नृत्ये सादर केली. अभ्यासी बंधू आणि भगिनींनी सादर केलेल्या भजनांमुळे भक्तीमय आणि शांत वातावरण निर्माण झाले.

पडद्यावर गुरुदेवांचे दर्शन झाल्यामुळे अभ्यासींची हृदये आंतरीक आनंदाने व्यापून गेली होती. चेन्नईहून चालू घडामोडींच्या थेट प्रक्षेपणामुळे गुरुदेवांची भौतिक उपस्थिती असल्याचे जाणवत होते. काही केंद्रांमध्ये केक कापणे आणि वाढदिवसांची गाणी गाण्याचे कार्यक्र -मसुध्दा झाले. नंतर व्हिस्पर्समधील संदेशांचे वाचन आणि मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम किंवा नाटके सादर करण्यात आली.

अनेक केंद्रांमध्ये सत्संगासाठी नेहमी उपस्थित असणाऱ्या अभ्यासींपेक्षा बऱ्याच जास्त संख्येने अभ्यासींची उपस्थिती जाणवत होती. सर्व केंद्रांमध्ये सादर झालेल्या भाषणे, नाटके आणि गटचर्चा यामधून योग्य आचरण, समर्पण, निष्ठा, ध्येय आणि मार्ग इत्यादी सहजमार्गाच्या विविध पैलूंना अधोरेखित करण्यात आले. बहुतांश केंद्रांमध्ये 'गुरुदेवांच्या जीवनामधील महत्त्वपूर्ण घटना' भाषणे, नाटके आणि गटचर्चा या स्वरूपात अभ्यासींसाठी सादर करण्यात आल्या.

लहान आणि मोठ्या अश्या दोन्ही प्रकारच्या केंद्रांनी 'ध्येय गाठण्याचे उद्देश, वृत्ती, आणि साधने' याप्रती अभ्यासींचे विचार संलग्न होण्यासाठी वार्तालाप आणि परस्पर–संवादी चर्चासत्रे आयोजित करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. अशाप्रकारे भारतभरातील विविध केंद्रामध्ये हा दिवस आत्मचिंतनात आणि भक्तीभाव, प्रेम आणि आंतरीक आनंद यांचा अनुभव घेत साजरा करण्यात आला.


अहमदनगर


नागपूर


गोंदिया


सोलापूर


भिलवाडा


जोधपूर


जयपूर


फुलगाव


मदुराई


कोलकाता


रांची


चिखली





## पंजाबमधील पहिला आश्रम–लुधियाना

रेल्वे स्थानकापासून १० किमी तसेच बस स्थानकापासून ६ किमी अंतरावर लुधियाना–पखोवाल मार्गावर हा आश्रम वसलेला आहे. सुमारे २००० चौरस यार्डस एवढ्या बांधलेल्या जागेत दोन मजली असलेल्या तीन इमारतींमध्ये, गुरुदेवांचे कुटीर, ध्यानगृह, निवासकक्ष, मुलांसाठी खेळण्याची जागा, कार्यालय, स्वयंपाकघर आणि स्वच्छतागृह आहे. येथे सुमारे ३५० लोक बसू शकतील एवढ्या क्षमतेचा ध्यानकक्ष आहे. गुरुदेवांच्या संमतीने खास अमेरीकेत तयार केलेली घंटा आश्रमामध्ये बसवण्यात आली आहे.

सुमारे ३०० अभ्यासींच्या उपस्थितीत विभाग प्रमुख निवृत्त मेजर जनरल बंधू हरभजन सिंग यांच्या हस्ते दि. २२ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी या आश्रमाचे उदघाटन झाले. चेन्नई येथून व्हिडीओ लिंकद्वारा गुरुदेवांनी अभ्यासींसाठी आश्रम खुला झाल्याची घोषणा करत आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी सर्व सुविधांचा अधिकाअधिक लाभ घेण्यासाठी अभ्यासींना उपदेश केला. बंधू हरभजन सिंग यांनी सत्संग संचालित केला आणि अभ्यासींना संबोधित केले. लुधियानाचे केंद्रप्रमुख बंधू रमण कपूर यांनी या अपूर्व अशा भेटीसाठी गुरुदेवांचे व या कार्यात सहभागी झाल्याबद्दल सर्व स्वयंसेवकांचे आणि अभ्यासींचे आभार मानले. सर्व अभ्यासींनी भारलेल्या वातावरणाचा आणि गुरुदेवांच्या अस्तित्वाचा अनुभव घेतला.

## मनमदुराई, तामिळनाडू

शिवगंगई जिल्ह्यातील मनमदुराई केंद्र बऱ्याच वर्षापासून बंधू राधाकृष्णान यांच्या निवासस्थानी चालवले जात असे. नुकतेच बंधू नित्यानंदन यांनी कार्यालय, स्वयंपाकघर आणि शौचालयसहीत २४०० चौ.फूट क्षेत्रफळ असलेला ध्यानकक्ष आणि ३३ सेन्ट्स क्षेत्रफळ असलेली जमीन देणगी दिली आहे. गुरुदेवांच्या अनुमतीवरुन विभाग प्रमुख बंधू टि.व्ही विश्वनाथ राव यांनी दि. २० जून रोजी येथे पहिला सत्संग संचालित केला. ह्या सत्संगासाठी सुमारे २०० अभ्यासी उपस्थित होते आणि ते संध्याकाळच्या सत्संगापर्यंत आश्रमामध्ये थांबले होते.

## वडकुंगलम, तामिलनाडू

वडकुंगलम आश्रमामध्ये वडकुंगलम, तिरुनेल्वल्ली, थुथुकुडी आणि कन्याकुमारी येथुन सुमारे ३०० अभ्यासीं गुरुदेवांचा वाढदिवस आणि नुकत्याच बांधलेल्या गुरुदेवांच्या कुटीराचा उदघाटन समारंभ साजरा करण्यासाठी जमले होते. आश्रमामध्ये अस्थायी स्वरूपाचा ध्यानकक्ष, गुरुदेवांच्या कुटीराच्या बाजूला शाकारलेले स्वयंपाकघर, स्वच्छतागृह आणि वर अभ्यासींसाठी वर्गखोली किंवा विश्रांतीकक्ष या पायाभूत सुविधा पूर्ण झाल्या आहेत.

सकाळी ८.३० वाजता गुरुदेवांच्या कुटीराच्या स्मृति–शिलेचे अनावरण करण्यात आले आणि ९ वाजता बंधू ए.पी. दुराई यांनी सत्संग संचालित केला यानंतर गुरुदेवांच्या भाषणामधील ‘दिव्य अस्तित्व फक्त आश्रमामध्येच सिमित नसते ते सर्वत्र जाणवले पाहिजे’ या विषयावरील उताऱ्याचे वाचन करण्यात आले. यानंतर अभ्यासींची भाषणे, गट चर्चा आणि आश्रमाच्या इतिहासावर आधारित चित्रफीतीचे सादरीकरण, तसेच गुरुदेवांचे गुरुपौर्णिमेच्या दिवशीचे भाषण सादर करण्यात आले. सत्संगाने कार्यक्रमाचा शेवट होण्यापुर्वी प्रश्नोत्तरांचे सत्र झाले.

## पय्यनुर, केरळ

गुरुदेवांच्या सूचनेवरुन दि. २२ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी विभाग प्रमुख बंधू के.यु.मोहन यांच्या हस्ते ध्यानकक्षाची कोनशिला बसविण्यात आली. सुमारे पासष्ट अभ्यासी या कार्यक्रमाच्यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सत्संगाने झाल्यानंतर पायाभरणीचा कार्यक्रम झाला. नंतर वृक्षारोपण करण्यात आले. अल्पोपाहारानंतर अभ्यासी गट–चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी ध्यानकक्षामध्ये पुन्हा जमा झाले. केंद्रप्रमुख बंधू टि.व्ही. कुन्हि कानन, त्यांच्या स्वागतपर भाषणात म्हणाले की या दिवशी बसवण्यात आलेली कोनशिला पय्यनुर आश्रमच्या उन्नतीमधील मैलाचा दगड आहे. त्यांनी प्रत्येक अभ्यासीने आश्रम बांधणीच्या कार्यात हृदयपूर्वक सहकार्य द्यावे यासाठी आवाहन केले. ते म्हणाले की सेवेद्वारा आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी गुरुदेवांकडून मिळालेली ही एक सुवर्णसंधी आहे.





## एका केन्द्राचा विकास : जावरा, मध्य प्रदेश



रतलाम जवळील जावरा या छोट्याशा गावात बऱ्याच वर्षांपासून केवळ दहाच नियमित अभ्यासी होते. दि. १२ जुलै रोजी भगिनी रुची यांच्या पुढाकाराने एक खुले सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर पंचाहत्तर इच्छुकांनी सहजमार्गात प्रवेश केला. दि. २४ जुलै रोजी गुरुदेवांचा वाढदिवस जावरा येथे नवीन अभ्यासींसह साजरा करण्यात आला. त्या पाठोपाठ दि. ३ व ४ ऑगस्ट यादिवशी विभाग प्रमुख बंधू प्रभाकर दास यांनी काही प्रशिक्षक व अभ्यासींसह पूर्ण दिवसीय कार्यक्रमासाठी जावरा व रतलामला भेट दिली. रतलाम व मन्सौर येथील अभ्यासींसह जावरातील पासष्ट नवे अभ्यासी कार्यक्रमास उपस्थित होते. बंधू प्रभाकर दास यांनी सहजमार्ग साधना या विषयावर प्रस्तुत केलेले सादरीकरण व भाषण, प्रश्नोत्तरांचे सत्र आणि प्रशिक्षकांशी अनौपचारिक चर्चा यामुळे अभ्यासींना आपल्या सर्व शंकांचे निरसन करण्याची एक चांगली संधी मिळाली.

दि. ९ व १० ऑगस्ट रोजी २६ इच्छुकांनी सहजमार्गात प्रवेश केला. अशा तऱ्हेने गेली कित्येक दशके दहा–बारा च्या आसपास अभ्यासी संख्या असणाऱ्या जावरा केन्द्राने केवळ एका महिन्यात अत्यंत उत्साहाने सहजमार्ग ही एक जीवनशैली म्हणून स्वीकारणाऱ्या ११२ अभ्यासींवर झेप घेतली. ज्यामुळे हे शक्य झाले ती जवळपासच्या केंद्रांमधील प्रशिक्षक व समन्वयक यांच्यात दिसून आलेली सांघिक भावना व त्यांच्यातील बंधूभाव हे अनुकरणीय आहेत.

## परमाकुडी, तामिळनाडू

चेन्नई येथील प्रशिक्षक बंधू अरुणाचलम यांच्या समवेत १४ अभ्यासींच्या एक गटाने दि. ६ व ७ जुलै रोजी मनमदुराई व परमाकुडी केंद्रांना भेट दिली. परमाकुडी येथे दि. ६ जुलै रोजी स्थानिक पंचवीस अभ्यासींसह सकाळी साडेअकरा वाजता सत्संगाने कार्यक्रमास सुरुवात झाली.

मनमदुराई येथे नुकतेच एका ध्यानगृहाचे उद्घाटन करण्यात आले होते. भोजनानंतर सर्व अभ्यासींनी तिकडे प्रयाण केले. केंद्रप्रमुख बंधू राधाकृष्णन व तेथे जमलेले ७० अभ्यासी यांनी त्यांचे स्वागत केले. दिलेल्या विषयावरील समूह चर्चेमुळे ध्यानगृहाचे वातावरण उत्साहमय झाले. यानंतर संध्याकाळी साडेसात वाजता सत्संग झाल्यावर रात्रीच्या मुक्कामासाठी अभ्यासी परमाकुडीला परतले,



परमाकुडी, रामनाथपुरम, सिंगमपुनारी, मदुराई, शिवगंगाई, मनमदुराई व चेन्नई येथून आलेल्या ७ प्रशिक्षकांसह ६० अभ्यासी रविवारी उपस्थित होते. सहजमार्गाच्या मूलभूत पैलूंवरील प्रश्नोत्तरांचे सत्र आणि गुरुदेव, मिशन व साधना पद्धति यावरील प्रश्नमंजूषा यामध्ये अभ्यासींनी उत्साहाने घेतलेला सहभाग हा आयोजकांनाही खरोखर प्रोत्साहित करणारा होता. त्यादिवशी तीन सत्संग घेण्यात आले. सर्व सत्रांचे नियोजन व संचालन बंधू अरुणाचलम यांनी केले होते. अभ्यासींना सहजमार्गाचे अधिक चांगले आकलन होण्यासाठी ही सत्रे खूप उपयुक्त ठरली.

## बनशंकरी, बंगळुरु

दि.१३ व १४ जुलै आणि ३ व ४ ऑगस्ट अशा दोन सत्रांमध्ये सुमारे ११० अभ्यासींसाठी 'मनन, साधनेय चिंतन शिबिर' हा कार्यक्रम कन्नड भाषेमध्ये आयोजित करण्यात आला होता. बंधू बी. श्रीनिवास यांनी या कार्यक्रमाचे नियोजन व समन्वयन केले होते. तसेच भगिनी वसंतकुमारी, बंधू डॉ. कृष्णमूर्ती व बंधू बी. जी. सुब्रमण्य या सहाय्यकांसमवेत त्यांनी या कार्यक्रमाचे संचालनही केले. या कार्यक्रमात साधनेच्या मूलभूत पैलूंचा सखोल अंतर्भाव करण्यात आला होता. साधनेच्या सूक्ष्म पैलूंवर समूह चर्चा व सादरीकरण करता यावे या हेतुने अभ्यासींना काही विषय व त्यावरील प्रश्न वाटून देण्यात आले होते. समन्वयकांनी दिलेली स्पष्टीकरणे व विशदीकरणे, गुरुदेवांची अवतरणे आणि प्रश्नोत्तरांचे सत्र यामुळे शंकानिरसन होण्यास सहाय्य झाले. अभ्यासींनी दिलेल्या प्रतिक्रिया उत्साहवर्धक होत्या. आध्यात्मिक प्राप्ती व गतिमान प्रगतीची तळमळ विकसित करण्यासाठी या कार्यक्रमाचे सहाय्य झाले.



# युवा कार्यक्रम

## मुंबई, महाराष्ट्र

दि. ३ ऑगस्ट रोजी, अलीकडेच तयार करण्यात आलेल्या प्रशिक्षणकक्षामध्ये, बंधू मोहनदास हेगडे यांनी संचालित केलेल्या 'सहजमार्गातील स्वारस्याची पुनर्स्थापना व पुनरुज्जीवन' या सत्रास पुणे व मुंबई येथील त्रेसष्ठ अभ्यासी उपस्थित होते.

प्रस्तावना झाल्यानंतर प्रत्येक अभ्यासीला त्याच्या दैनंदिनीमध्ये स्वतःच स्वतःला दिलेले एक अभिवचन लिहिण्यास आणि नंतर या सत्रामध्ये त्यांना जे मिळेल त्याचा उपयोग करुन ते वचन पाळण्यास सांगण्यात आले. त्यानंतर 'संतुलित जीवनाची आवश्यकता' या विषयावर एक सादरीकरण तसेच 'दैनंदिन साधनेत स्वारस्य कसे विकसित करावे' आणि 'छाप विरहित जीवन कसे जगावे' या विषयांवर समूहचर्चा करण्यात आली. दैनंदिन साधनेत स्वारस्य विकसित व्हावे याकरीता मनोवेधक कल्पना सुचण्यासाठी या गटचर्चेचा त्यांना उपयोग झाला. बंधू हेगडे यांच्या 'सहजमार्ग साधनेचे प्रयोजन' या विषयावरील भाषणानंतर संध्याकाळच्या सत्संगाने या सत्राची सांगता झाली.

## भिलवाडा, राजस्थान



दि.२८ जुलै रोजी झालेल्या युवा बैठकीस पंधरा अभ्यासी उपस्थित होते. दैनंदिन कामकाज त्यांच्या स्मरणात कसे करावे ज्यामुळे काम हीच पूजा ठरेल यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. यासंबंधी काही अभ्यासींनी आपले अनुभव कथन केले. मिशनच्या साहित्यातील या विषयावरील उताऱ्यांचे वाचन करण्यात आले. पुढील बैठकीत आपले अनुभव सांगता यावेत यासाठी पुढील बैठक होईपर्यंत प्रत्येकाने सतत स्मरणामध्ये रहाण्याचा प्रयत्न करावा, असे यावेळी ठरविण्यात आले.

## श्री गंगानगर, राजस्थान

'स्वयं शिस्त' या विषयावरील एका सत्रामध्ये पंधरा अभ्यासी सहभागी झाले होते. या विषयावरील एक दृक्श्राव्य लघुचित्रफीतही दाखविण्यात आली. त्यानंतर 'जो स्वतः शिस्त पाळतो तोच खरा शिष्य असतो' या बाबूजी महाराजांच्या विधानाने चर्चेस सुरुवात झाली. दैनंदिन साधना व दहा सूक्तांचे पालन करण्याने स्वयं अनुशासन पाळण्यास व मनुष्य जीवनाचे वास्तविक ध्येय गाठण्यास सहाय्य होते या विचाराने चर्चेचा शेवट झाला.

## कोलकाता, पश्चिम बंगाल

बीएमए, कोलकाता येथे आयोजित दोन दिवसीय युवा सभेस कोलकाता आणि राणीगंज, असनसोल, झारग्राम व दुर्गापूर या सारख्या जवळपासच्या केंद्रांतून सुमारे चाळीस अभ्यासी उपस्थित होते. संध्याकाळच्या सत्संगानंतर 'पास इट ऑन' या गीतावर आधारित प्रारंभिक सत्राने कार्यक्रमास सुरुवात झाली. सहजमार्गाच्या दहा सूक्तांतील विषयांवर आधारित 'आंतरिक व बाह्य संतुलन' या एका गटाने सादर केलेल्या नाटिकेमुळे १० सूक्तांचे गंभीरपणे पालन करण्याप्रति प्रयत्नशील होण्यासाठी सहभागींना प्रेरणा मिळाली. दुसरे दिवशी सकाळी साधनेचे महत्वाचे पैलू या विषयावरील गुरुदेवांच्या भाषणातील कात्रणे थोड्या थोड्या वेळाच्या अंतराने वाचून दाखविण्यात आली. त्यामुळे आपण काय ऐकले यावर मधील वेळात गंभीरपणे विचार करणे सहभागींना शक्य झाले. गोटी व नळ्या यांच्या शर्यतीतून



जीवनातील संतुलनाचे महत्व विशद करून सांगण्यात आले. तसेच 'फक्त दोन मिनिटे' या सत्रामुळे प्रत्येक अभ्यासीला दिलेल्या विषयावर दोन मिनिटे बोलणे भाग पडले. संध्याकाळच्या सत्संगानंतर प्रतिक्रिया (फीडबॅक) सत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.



## मुंबई – अलिबाग सहल

दि. १५ जुलै रोजी पंचेचाळीस अभ्यासी युवक व काही प्रशिक्षक पनवेल आश्रमातून अलिबागला रवाना झाले. एकमेकांना जाणून घ्यावे तसेच 'त्यांच्या' स्मरणात काल व्यतीत करावा हा या सहलीचा उद्देश होता. निर्धारित ठिकाणी पोहोचल्यावर गुरुदेवांच्या भाषणाची दृक्श्राव्य चित्रफीत दाखविण्यात आली. त्यानंतर दहा सूक्तांवर आधारित एक उत्कंठापूर्ण कार्यक्रम झाला. अलिबाग शहरात जेवण घेतल्यानंतर दुपारच वेळ समुद्र किनारी व्यतीत करण्यात आली.

रात्रीच्या जेवणानंतर अभ्यासी बंधू इचक एडिझ यांची चित्रफीत दाखविली गेली व त्यानंतर दमलेले सर्व युवक झोपावयास गेले. सर्व मुलांनी बंधू टिल्लू यांच्या शेतावरील घरी मुक्काम केला तर सर्व मुली भगिनी पीना शाह यांच्या घरी मुक्कामास होत्या. दुसऱ्या दिवशीचा सत्संग पुनरुज्जीवन करणारा होता ज्यानंतर समर्पण कसे करावे व साधना व मिशनच्या कामामध्ये स्वत:ला अधिकाधिक कसे गुंतवून घ्यावे यावर चर्चा करण्यात आली. या सत्रानंतर पनवेल आश्रमात परतताना युवकांनी त्या परिसरातील छोटे केंद्र नागोठण्याला भेट दिली.



## नवीन नेमणूका

**केंद्रप्रमुख**

बंधू गौरी शंकर द्विवेदी
मिर्झापूर, उ. प्र.

बंधू दिलीप कुमार सिंग
फतेहपूर, उ. प्र.

बंधू प्यारेलाल
मुघलसराय, उ. प्र.

बंधू रवी कुमार जैन
रॉबर्टगंज (सोनभद्र), उ. प्र.

बंधू जे. के. मेहेरोत्रा
बहराईच, उ. प्र.

बंधू नरेश चावरा
धनबाद, झारखंड

भगिनी एलिझाबेथ डेन्ले
संचालक, इतिहास आणि पुराभिलेख विभाग

## निमंत्रण

प्रकाशन समिती सर्व अभ्यासींना व त्यांच्या मुलांना प्रकाशनासाठी रचनात्मक योगदान देण्यास आमंत्रित करित आहे. खालिलपैकी एक वा अनेक विभागांमध्ये योगदान देता येईल.

- कला, चित्रमेळ (कोलाज), चित्रकला किंवा इतर कोणत्याही स्वरुपातील कलारचना जी तुमची स्वत:ची निर्मिती आहे
- तुम्ही स्वत: घेतलेली छायाचित्रे
- एडोबे फोटोशॉप वा तत्सम कार्यप्रणाली वापरुन तयार केलेली आकृतीबंधाची रचना – ज्यामध्ये चित्राच्या मूळ उगमाविषयी अथवा कलारचनेविषयी स्पष्ट उल्लेख असावा.

वरीलप्रकारच्या पाठविलेल्या कलारचना प्रकाशन समितीद्वारे तपासल्या जातील व मिशनच्या पुस्तकांच्या मुखपृष्ठासाठी अथवा ध्वनिचित्रमुद्रिकांसाठी निवडक अशा कलारचना वापरल्या जातील. आपल्या रचना अभिप्रायादाखल पाठवितांना आपण त्यांच्या प्रकाशनाचे सर्व अधिकार स्पिरिच्युअल हायरारकी पब्लिकेशन ट्रस्टकडे देत आहात याची कृपया नोंद घ्यावी.
या कलारचना खालिलस्वरुपात प्रस्तावित केल्या जाऊ शकतांत

- इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, कमी चित्रण क्षमतेची (Low Resolution) (१ एम.बी. क्षमतेपेक्षा कमी) फाईल design@shpt.in या इमेल पत्त्यावर पाठवावी. कलारचनेची निवड झाल्यास जास्त चित्रण क्षमतेची (High Resolution) फाईल पाठविण्याची विनंती करण्यात येईल.
- खालिल पत्त्यावर पोस्टाद्वारे पाठवावी.

  *संकल्पना समिती,*
  *स्पिरिच्युअल हायरारकी पब्लिकेशन ट्रस्ट,*
  *ॲडमिन बिल्डींग,*
  *बाबूजी मेमोरिअल आश्रम,*
  *मणपक्कम, चेन्नई – ६०० ०२५*

आपली कलारचना पाठवितांना खालिल माहिती सोबत पाठवावी

आपले नाव, वय (जर प्रेषक लहान मुले असतील तर), अभ्यासी ओळख क्रमांक (प्रेषक लहान मुले असतील तर पालकांचा ओळख क्रमांक द्यावा), केंद्राचे नाव, संपर्कासाठीचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक आणि इमेल ॲड्रेस. आपली कलारचना प्रकाशनाकरिता निवडली गेल्यास प्रकाशन समितीद्वारे आपल्याशी संपर्क साधला जाईल.

प्रिय बंधू आणि भगिनींनो,
आपणांसमोर येऊन पूज्य गुरुदेवांच्या तब्येतीविषयी माहिती देण्यास मला थोडा विलंब झाला यासाठी मी आपणा सर्वांची माफी मागतो. पू. गुरुदेव चालू असलेल्या औषधोपचारास अतिशय चांगला प्रतिसाद देत आहेत परंतु औषधांमुळे होणाऱ्या इतर परिणामांनी त्यांना अशक्तपणा आला आहे.

निव्वळ इच्छाशक्तिच्या जोरावर त्यांनी आपले भौतिकोपचार नेमाने सुरु ठेवले आहेत.

त्यांचे आरोग्यविषयक सर्व निर्देशांक सामान्य आहेत. कृपया त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करणे असेच सुरु ठेवावे.

त्यांनी आपणासर्वांना आपल्या प्रार्थनांसाठी, ज्याचा त्यांना फायदा होत आहे, धन्यवाद दिले आहेत.
मन:पूर्वक,
डॉ. नटवर शर्मा.

# नवीन प्रकाशने





इन्स्पिरेशन्स
डीव्हीडी इंग्लिश





ए रेअर ऑपॉर्च्युनिटी
डीव्हीडी इंग्लिश





इन्व्हर्टेन्डो हार्ट टू हार्ट
डीव्हीडी इंग्लिश




वन वर्ल्ड वन फॅमिली
डीव्हीडी इंग्लिश




डिसिप्लीन ॲण्ड ब्रदरहूड
डीव्हीडी इंग्लिश




दहा सुत्रे व राजयोगाच्या प्रभावावर
भाष्य
एम पी ३ इंग्लिश





दहा सुत्रे व राजयोगाच्या प्रभावावर
भाष्य
एम पी ३ तमिळ





दहा सुत्रे व राजयोगाच्या प्रभावावर
भाष्य
एम पी ३ हिंदी




सत्योदय
एम पी ३ तमिळ




विजडम टू वंडर
इंग्लिश




कोळ्याचे जाळे भाग ३
इंग्लिश





त्यांच्या पावलांचे अनुसरण
भाग ३ तेलुगू




यादोंकी गलीयोंमें भाग एक
हिंदी





हृदयीचे बोल २००३
तमिळ



टेल्स ऑफ वंडर व्हॉल्युम १
कन्नड




प्रिफेक्ट्स डिरेक्टरी
जुलै १३




हृदयाचे साहस

## ईरोड आश्रम, तामिळनाडू

## प्रकाशाचे केंद्र







कोईम्बतूरहून बदली होऊन आलेले एक बंधू ईरोडचे प्रथम अभ्यासी होते. ईरोड येथे त्यांनी पहिल्या मजल्यावर ध्यानकक्ष असलेले घर बांधले आणि अशाप्रकारे फेब्रुवारी १९८२ मध्ये ईरोड केंद्राची सुरुवात झाली. १९९३ साली ते बंधू ईरोड केंद्राचे पहिले प्रशिक्षक बनले. अभ्यासींची संख्या वाढल्यानंतर त्यांनी आपल्या घराच्या मागील बाजूस साधारण २०० अभ्यासी बसू शकतील अशा तंबूमध्ये ध्यानकक्षाची जागा हलविली.

दि. ३ नोव्हेंबर २००० रोजी पू. गुरूदेवांनी अचानकपणे या केंद्रास भेट दिली. त्यांनी सत्संगाचे संचालन केले. गुरुदेवांच्या अल्प वास्तव्यादरम्यान येथील प्रत्येक अभ्यासीला येथे आश्रम असलाच पाहिजे अशी आतून जाणीव झाली. थोड्याच अवधीनंतर भवानी आणि पेरुंदराई यांच्यामधून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ जवळ असणाऱ्या अत्तयमपलायम ह्या ठिकाणी आश्रमासाठी नवीन जागा घेण्यात आली.

दि.२४ ऑक्टोबर २००१ रोजी सोसायटीच्या नावे ७ एकर जागेचे नोंदणीकरण करण्यात आले. २.३८ एकर जमीन आश्रमासाठी राखून ठेवण्यात आली व उरलेली जमीन अभ्यासींनी वाटून घेतली. डिसेंबर २००१ पर्यंत २५० अभ्यासी बसू शकतील अशी ६० X ४० फूट क्षेत्रफळाची जागा गवत-कडब्याचे छप्पर घालून ध्यानासाठी तयार करण्यात आली. प्रिय गुरुदेवांचे वास्तव्य सुखकारक व्हावे म्हणून आधीची जुनी कौलारू इमारत डागडुजी व आवश्यक त्या सुधारणा करून गुरूदेवांचे कुटीर म्हणून वापरात आणण्यात आली आहे.

दि. १ एप्रिल २००१ रोजी गुरूदेव जागेच्या नोंदणीकरणासाठी ईरोड येथे आले यावेळी ते दोन दिवस राहिले होते. त्यावेळी ते म्हणाले की ईरोड आश्रम हा आजुबाजूच्या केंद्रांसाठी मध्यवर्ती केंद्र ठरेल. या वक्तव्याप्रमाणे आजुबाजूच्या केंद्रांतील सर्व अभ्यासी महिन्याच्या दुसऱ्या रविवारी येथे एकत्र जमतात.

जेव्हा जेव्हा गुरुदेव तिरुपूरला जात असत तेव्हा ते ईरोडला थांबत असत. २०१० मध्ये ४००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या कायमस्वरुपी स्वयंपाक घर आणि भोजनकक्ष यांचे बांधकाम सुरु करण्यात आले. गुरुदेव दि. १४ मे २०११ रोजी तिरुपूरला जाता-जाता वाटेत ईरोड येथे थांबले. त्यांनी स्वयंपाकघर व भोजनकक्षाचे उदघाटन केले आणि सत्संगाचे संचालन केले.

स्वच्छतागृहे, जनरेटर खोली, अतिथीगृह, सुरक्षाकक्ष, मुलांसाठी खेळण्याची जागा इ. गोष्टींनी युक्त असा हा आश्रम आहे. प्रत्येक रविवारी सुमारे २०० अभ्यासी ईरोडच्या आश्रमात सत्संगासाठी येतात. तीन महिन्यांतून एकदा एका रविवारी जवळपासच्या करुमन्दम्पलायन, अरचलूर, भवानी, पेरुंदुराई, गोबी, कविन्दपडी, सत्यमंगलम आणि पल्लीपलायम इ. केंद्रामधून येथे येणाऱ्या अभ्यासींकरीता पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. अभ्यासींच्या वाढत्या संख्येकडे पाहता नवीन ध्यानगृहाची योजना आखण्यात आली आहे.






To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2013 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. “Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", “SRCM”, “Constant Remembrance” and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.